# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ द्वारे ३३वे भुयारीकरण यशस्वीरीत्या पूर्ण!

## चर्चगेट ते हुतात्मा चौक मेट्रो स्थानकादरम्यान बोगदा तयार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मार्गिकेतील अत्यंत महत्त्वाच्या चर्चगेट ते हुतात्मा चौक येथील मेट्रो स्थानकादरम्यान असलेला बोगदा शुक्रवारी यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आला. मेट्रो-३ च्या मार्गिकेतील हे ३३ वे भुयारीकरण आहे. मेट्रो-३ प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ८८% भुयारीकरण व ६०% बांधकाम पूर्ण झाले आहे.

चर्चगेट ते हुतात्मा चौक स्थानकांतील अंतर ६६३ मीटरचे आहे. भुयारीकरणादरम्यान एकूण ५०२ रिंग्जचा वापर केला गेला. अवघ्या २०५ दिवसांत डाउन लाईन मार्गाचे भुयारीकरण एसटीईएम बोगद्यात पूर्ण करण्यात आले. एसटीईएम बोगद्यात पूर्ण होणारे हे मेट्रो-३चे पहिलेच भुयारीकरण आहे. सूर्या-२ या रॉबिन्स बनावटीच्या ड्युएल-मोड हार्ड-रॉक टनेल बोअरिंग मशीनद्वारे हा बोगदा खणण्यात आला.

दक्षिण मुंबई परिसरातील फ्लोरा फाउंटनसह अन्य ऐतिहासिक इमारतींखालून भुयारीकरण करणे एक आव्हानात्मक काम होते. पारंपरिक कटअँड कव्हर आणि न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग या दोन्ही पद्धतींचा संयुक्तिक वापर करून हे अभियांत्रिकी आव्हान पूर्ण करण्यात आले. चर्चगेट आणि हुतात्मा चौक स्थानकादरम्यान असलेली व्यापारी केंद्रे याद्वारे जोडली जातील, अशी माहिती एमएमआरसीने व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी दिली.

पॅकेज-१ अंतर्गत कफ परेड, विधान भवन, चर्चगेट आणि हुतात्मा चौक या मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. आतापर्यंत हुतात्मा चौक स्थानकाचे एकूण ५३% काम पूर्ण झाले आहे. पॅकेज-१ मध्ये एकूण ८०% भुयारीकरण आणि ५८% बांधकाम पूर्ण झालेले आहे.

